दै. सामना दि. 02/12/2022

# खंजीरचा धाक दाखवून जबरी चोरी करणारे अटकेत

नांदेड, दि. १ (प्रतिनिधी) - खंजीरचा धाक दाखवून जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली.

कंधार तालुक्यातील पेठवडज येथील प्रदीप नाकाडे हे २४ ऑक्टोबर रोजी गावाकडे जात असताना चार जणांनी अडवून खंजीरचा धाक दाखवत सोन्याचे दागिने, मोबाईल व रक्कम लंपास केली. या प्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कंधार तालुक्यातील गोणार येथे जाऊन मगदूम कासिम शेख (रा. गोणार), सुरेंद्र व्यंकटी गायकवाड (रा. किवळा) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. या दोन्ही आरोपींना कंधार पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक सचिन सोनवणे, सहायक पोलीस उपनिरीक्षक मारोती तेलंग, पोकॉ. रणधीर राजबन्सी, मोतीराम पवार, महेश बडगू, विलास कदम, हनुमान ठाकूर, दीपक ओढणे व राजू शिटीकर यांच्या पथकाने पार पाडली.



**मुखेड : पेटवडज रोडवर जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने पकडले.**